| | |
|---|---|
| नि.फौ.ख.क्र. ४२७६/२०२५ |
| सरकार -वि- तौसीफ खान |
| निशाणी क्र. ०६ |

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची शपथेवर सरतपासणी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | प्रमोद गोविंदा दोनोडे, |
| **वय** | : | ५४ वर्षे, |
| **धंदा** | : | खाजगी नोकरी, |
| **राहणार** | : | वडोदा, ता.कामठी, जिल्हा नागपूर |

**<u>सरकार पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती प्रियंका भा. झिरपे यांचेमार्फत-</u>**

जुन २०२५ मध्ये मी मनोज इटकेलवार, रा. नागपूर यांच्या बंगल्यावर साफसफाईचे काम व गायींच्या देखभालीचे काम करीत होतो. त्यांच्याकडे चार गायी होत्या. सदर गायी गाठयामध्ये बांधलेल्या राहतात. सदर प्रकरणातील फिर्याद दिल्यानंतर मी सदर काम सोडून दिले.

२. दिनांक ०२.०६.२०२५ रोजी रात्री १०.३० ते ११.०० वाजता मी सर्व गायी बघीतल्या असता चारही गायी बांधून होत्या. त्यानंतर मी झोपी गेलो. त्यानंतर मी रात्री १.३० वाजता लघवीसाठी उठालो असता गायी होत्या. दुसऱ्या दिवशी सकाळी ५.३० वाजता उठून मी गोठयात गेलो असता तीन गायी आढळून आल्या व एका गायीची दोरी कापलेल्या अवस्थेत दिसली व सदर गाय कोणीतरी चोरी करुन नेली होती. त्या गायीचा रंग फिक्कट लालसर होता व अंदाजे किंमत १०,०००/- होती. त्यानंतर मी त्या गायीचा एक तास शोध घेतला असता ती कोठेही आढळून आली नाही. त्यामुळे मी मालक मनोज इटकेलवार यांना फोन केला. त्यांनी फोन उचलला नाही म्हणून मी त्यांचा मॅनेजरला फोन केला. मॅनेजरचे नाव मला आता आठवत नाही. काही

वेळानंतर मालकांनी मला फोन केला व गायीबाबत फिर्याद देण्यास सांगितली. त्यानंतर मी गावच्या पोलीस पाटलाकडून लेखी फिर्याद लिहून घेतली. परंतु मी नंतर कळमना पोलीस स्टेशन येथे अज्ञात व्यक्तीविरुध्द तोंडी फिर्याद दिली.

३. आता मला फिर्याद दिनांक ०३.०६.२०२५ दाखविण्यात आली, ती तीच आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी पी-१** देण्यात येते. तसेच आता मला छापील प्रथम खबर दाखविण्यात आली. त्यावर सुध्दा माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी पी-२** देण्यात येते. त्यानंतर पोलीसांना सदर गाय मिळाली की नाही किंवा आरोपी मिळाले की नाही, हे मला माहीत नाही. कोर्टासमक्ष व्ही.सी.द्वारे हजर असलेल्या आरोपीला मी ओळखत नाही.

**उलट तपास आरोपीतर्फे आरोपीचे विद्वान विधीज्ञ प्राची गुप्ता यांचेमार्फत**

४. नाकारला.

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास – नाही**

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

ANAMIKA DEBASHISH BOSE

Digitally signed by ANAMIKA DEBASHISH BOSE
Date: 2025.12.22 16:40:40 +0530

**( अनामिका दे. बोस )**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक २२.१२.२०२५